# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी** २२१६ ३९६४/२२१६ ३९६५
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**


**जाहिरात क्र. ३३/२०२३-२४**

## जाहीर सूचना

## प्रारुप विनियमांवर अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागविण्याबाबत

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ किंवा आयोग) खालील प्रारुप विनियम तयार केले आहेत;

१) प्रारुप मविनिआ (संसाधन पर्याप्ततेची चौकट) विनियम, २०२४
२) प्रारुप मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०२४
३) प्रारुप मविनिआ (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४
४) प्रारुप मविनिआ (कर्मचाऱ्यांची सेवा-भरती आणि सेवा-भर्ती) विनियम, २०२४

२. हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३. प्रारुप सुधारणा विनियमांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या **(www.merc.gov.in/e-public-consultation)** संकेत-स्थळावरील **'E-public consultation'** या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान **मोबाईल क्र.** ८९२८०७१५२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात. **'E-public consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकतीअपलोड केलेल्या व्यक्तीस त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५ या पत्यावर **दि. २८ मार्च, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना / हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

४. **दि.२८ मार्च, २०२४ रोजी** किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

**सही/-**

दिनांक : ०७/०३/२०२४ **(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
ठिकाण : मुंबई **सचिव, मविनिआ**